





# चैतन्य लहरी

नोव्हेंबर / डिसेंबर २००५ अंक क्र. ११/१२















# म्युझिक प्रोग्राम, प्रतिष्ठान, दिनांक २३, नोव्हेंबर २००५








# अनुक्रमणिका


- म्युझिक प्रोग्राम, प्रतिष्ठान, नोव्हेंबर २००५ ..... २
- दिवाळी पूजा, -वृत्तांत ..... ३
- श्रीसूक्त ..... ५
- सहजयोगामध्ये प्रगती आणि कार्य ..... ६
- तीर्थरूप पापाजी यांचे भाषण, दिवाळी पूजा, दिनांक १२ नोव्हेंबर २००५ ..... ९
- प.पू. श्रीमाताजींचे प्रवचन (राहुरी २६ फेब्रुवारी ८४) ..... ११
- पसायदान ..... १३
- हंस चक्राबाबत ..... १४
- दिवाळी पूजा, ऑक्टोबर ८९ ..... १५


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट, सी.डी. पुस्तके, मासिके, श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्यलहरी व युवादृष्टी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था ''निर्मल इन्फोसिस्टीम ॲण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि पुणे'' या कंपनीमार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की ,निर्मल इन्फोसिस्टीमस ॲण्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि.या कंपनीच्या लेखी परवानगीशिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करू नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लीडरवर राहील.

तसेच चैतन्य लहरी मराठी मासिकाचे सन २००६ सालासाठी नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT.LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. सभासदांची वार्षिक वर्गणी मागील वर्षाप्रमाणेच हातपोच घेणाऱ्यासाठी रुपये २००/- व पोष्टाने मागविणाऱ्यांसाठी रुपये २२५/- एवढी ठेवली आहे. तसेच परगांवच्या सहजयोग्यांनी शक्य झाल्यास ग्रुप बुकिंग केल्यास अंक पोष्टाने पाठविताना सोईचे होईल.कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT. LTD.

BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD,

KOTHRUD,PUNE 411 O29. TEL. 020 25286537

## म्युझिक प्रोग्राम, प्रतिष्ठान, दिनांक २०, नोव्हेंबर २००५

प्रतिष्ठानमधील हॉलमध्ये म्युझिक प्रोग्रामचे आयोजन केले होते. साधारण ८:३० च्या सुमारास श्रीमाताजी व श्रीपापाजी यांचे हॉलमध्ये आगमन झाले. त्यावेळी श्रीमाताजीना फुले अर्पण करण्यात आली. त्यावेळी श्रीमाताजींच्या समोर पुणे म्युझिक ग्रुपने सुरवातीला बिनती सुनिये आदिशक्ती मेरी, जय जय जननी श्रीगणेशकी, हमको तो निर्मल-मैया तेरा ही सहारा है ही तीन भजने झाली. साधारण ९.३० च्या सुमारास कार्यक्रम संपला. आज श्रीमाताजी अत्यंत प्रसन्न व आनंदी होत्या.

## म्युझिक प्रोग्राम, प्रतिष्ठान, दिनांक २३ नोव्हेंबर २००५

प्रतिष्ठानमधील हॉलमध्ये म्युझिक प्रोग्रामचे आयोजन केले होते. साधारण ९.३० च्या सुमारास श्रीमाताजी व पापाजी यांचे हॉलमध्ये आगमन झाले. श्रीमाताजींच्या समोर पुणे वडगांव म्युझिक ग्रुपने सुरवातीला गणेशावर आधारित भजन त्यानंतर रामावर आधारित आणि शेवटी हे निर्मल माँ तेरा प्यार मोक्ष का आनंद है माँ ही भजने सादर केली. साधारण ४५ मिनिटे कार्यक्रम सुरू होता. आजही श्रीमाताजी अत्यंत आनंदी व प्रसन्न होत्या.

## म्युझिक प्रोग्राम, प्रतिष्ठान, दिनांक ३०, नोव्हेंबर २००५

प्रतिष्ठानमधील हॉलमध्ये म्युझिक प्रोग्रामचे आयोजन केले होते. साधारण ९.०० च्या सुमारास श्रीमाताजी व पापाजी यांचे हॉलमध्ये आगमन झाले. श्रीमाताजींच्या समोर नाशिकचे प्रसिद्ध सिंथेसायझर वादक श्री धनंजय धुमाळ आणि कुटुंबीय यांनी भजने सादर करताना सुरवातीला, प्यारभरे ये दो निर्मलनैन, निर्मला किती वर्णावी तुझी ग स्तुती, जोगवा, हे मन गुरु शरणमें रहियो रहियो, त्यांच्या कुटुंबातील बाल कलाकारांनी, 'आलारे गणपती आला रे' ही भजने सादर केली. त्यांनतर श्री धुमाळ यांनी श्रीमाताजींच्या चरणावर आपल्या सर्व कुटुंबियांची ओळख करून देताना सांगितले की आमच्या कुटुंबात एकूण १७ जण असून सर्वजण श्रीमाताजींच्या कृपेत कलाकार आहेत. त्यावेळी श्री पापाजींनी व श्रीमाताजींनी त्यांना अनंत आशीर्वाद दिले.

## म्युझिक प्रोग्राम, प्रतिष्ठान, दिनांक ६, डिसेंबर २००५

प्रतिष्ठानमधील हॉलमध्ये म्युझिक प्रोग्रामचे आयोजन केले होते. साधारण १०:०० च्या सुमारास श्रीमाताजी, पापाजी व कल्पनादीदींचे हॉलमध्ये आगमन झाले. श्रीमाताजींच्यासमोर मुंबई ठाणे-कल्याण ग्रुपमधिल चंद्रशेखर वझे आणि सहकारी यांनी भजने सादर करताना सुरवातीला स्वस्थी श्री गणणायका हा श्लोक सादर केला. त्यानंतर श्रीमाताजी वंदू तव चरण, तुझ्या पूजनी अर्चनी लीन व्हावे, कव्वाली व शेवटी जयोऽस्तुते जयोऽस्तुते श्री महामंगले सादर केली. साधारण १२:०० च्या सुमारास कार्यक्रम संपला. शेवटी श्रीमाताजींच्याहस्ते सर्वांना प्रेझेंट देण्यात आली.

# दिवाळी पूजा - वृत्तांत

## पुणे दिनांक १२ नोव्हेंबर व १३नोव्हेंबर २००५ (वृत्तांत)

दिवाळी पूजा अनेक वर्षांनंतर भारतात होत असल्याने सर्वत्र उत्साह जाणवत होता. बालेवाडी स्टेडियमध्ये साधारण १० दिवस अगोदर पासूनच स्टेजचे काम सुरू होते. तसेच स्टेडियममध्ये खास कलकत्त्याहून मागविलेल्या विद्युत रोषणाईच्या कमानी लावण्याचे काम सुरू होते. दिनांक ११ पासूनच बाहेरगावच्या सहजयोग्यांचे स्टेडियमध्ये आगमन सुरू झाले होते.

<u>दिनांक १२.११.२००५</u>

सकाळी ६.३० वा सामूहिक ध्यान मुख्य स्टेडियमवर झाले.संध्याकाळी म्युझिक प्रोग्रामची सुरुवात साधारण ७.०० च्या सुमारास तीन महामंत्रांनी झाली. सुरवातीला श्री राजेंद्र पुगालिया यांनी सर्वांचे स्वागत केले. तसेच अनेक वर्षानंतर नारगोळ नंतर दिवाळी पूजा भारतात होत असल्याचे सांगितले. तसेच दिवाळी पूजा पुण्यात घेण्यासाठी श्रीमाताजींनी मान्यता दिल्याबद्दल मनापासून आभारी असल्याचे सांगितले. त्यानंतर आजच्या कार्यक्रमाचे संयोजन करण्यासाठी श्री पराग राजे यांना स्टेजवर आमंत्रित केले.

सुरवातीला पी.के.ॲकॅडमी तर्फे श्री अरुण आपटे व सुरेखा आपटे यांनी 'या देवी सर्व भुतेषु, या कुंदे तुत' हे दोन श्लोक सादर केले. त्यावेळी सर्वत्र प्रचंड व्हायब्रेशन्स जाणवत होते.त्यानंतर ॲकॅडमिच्या विद्यार्थांनी, माँ हमारी वंदना स्वीकार करो हे भजन सादर केले. श्री सुब्रमण्यम यांनी आखो मे बसी हो माँ, श्री राजेश युनिव्हर्सल यांनी, सलमा सिराल वाली, सहजी झुम झुम के नाचे ही भजने सादर केली. श्री धनंजय धुमाळ यांनी सिंथेसायजरवर राग किरवानी वाजवला. त्यांना तबल्याला साथ खान यांनी दिली. त्यांनतर मंबई म्युझिक ग्रुपने , भय भंजना सुन हमारी व कव्वाली करार मुझको नही है बेकरारसे सादर केले.

त्यांनतर प्रसिद्ध सितार वादक श्री डिबू चौधरी आणि सहकारी यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी नवीन राग स्वानंदेश्वरी व राग बिश्वेश्वरी सादर केला. त्यांचा कार्यक्रम संपला तेव्हा रात्रीचे ९.३० वाजून गेले होते. त्यानंतर नुकतीच प्रतिष्ठानवर झालेल्या श्रीमाताजींच्या पूजेची सीडी दाखविण्यात आली. त्यानंतर श्रीपापाजी व कल्पनादीदींचे स्टेजवर आगमन झाले. त्यावेळी श्री राजीवकुमार यांनी श्रीमाताजींच्या घेत असलेल्या काळजीबद्दल सर्व जगातील सहजयोग्यांच्या वतीने श्रीपापाजींचे आभार मानले. त्यानंतर श्रीपापाजींनी सर्व सहजयोग्याना मार्गदर्शन केल्यानंतर श्री पापाजी व कल्पनादीदी निवासस्थानी गेल्या.

त्यानंतर दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी प्रतिष्ठानवर झालेल्या पूजेची सीडी दाखविण्यात आली.

त्यानंतर रात्री १०.३० च्या सुमारास स्टेजवर सूत्रसंचलनासाठी डॉ उदवानी यांना आमंत्रित केले. त्यावेळी निर्मल संगीत सरितातर्फे सुरवातीला श्री शाम जैन यांनी राग मधुकंस सादर केला व नंतर जगत जननी निर्मल माता हे भजन सादर केले. त्यांना हार्मोनियमवर धनंजय धुमाळ व तबल्यावर श्री संजय पोपटकर यांनी साथ दिली. व्हायलिनवादक श्री गुरुजी व सितार वादक श्री अवी शिवलीकर यांनी जुगलबंदीत राग बागेश्वरी सादर केला त्यांना तबल्याला साथ संदेश पोपटकर यांनी दिली. कु आकांक्षा व छाया यांनी, काम जिसका फक्त दौलत दिलकी लुटाना है ही कव्वाली सादर करुन आजचा कार्यक्रम संपवला.

१३.११.२००५

आजचा पूजेच्या दिवसाची सुरवात सकाळच्या ६.३० वा सामूहिक ध्यानाने झाली. संध्याकाळी मुख्य स्टेडियममध्ये कार्यक्रमाची सुरवात तीन महामंत्रांनी झाली. त्यानंतर
निर्मला किती वर्णावी तुझी ग स्तुती हे भजन झाले. त्यानंतर १ आक्टोबर २००५ रोजी राष्ट्रपतीभवनात झालेल्या कार्यक्रमाची सीडी दाखविण्यात आली. त्यानंतर हे जग जननी, मैया आदि मिलादे परंपार, हे मन गुरु शरण मे रहियो, तेरे चरण कमलमे रहनेवाले लिखले अपना नाम, अपने दिलमे सहजको बसाया करो ही भजने झाली. त्यानंतर आकाशात फटाक्याची आतषबाजी सुरू झाली आणि सर्वजण उभे राहिले.

स्टेजवरचा पडदा बाजूला झाला आणि सर्वांना श्रीमाताजींच्या प्रसन्न दर्शनाचा लाभ झाला. सुरवातीला दोन सुवासिनींनी श्रीमाताजींना ओवाळले. त्यानंतर त्यांच्या चरणावर पुष्पहार अर्पण केला. त्यावेळी सर्वजण स्वागत आगत स्वागत हे भजन गात होते. श्रीमाताजींच्या चरणावर लहान मुलांच्या हस्ते फुले अर्पण करून चरण पूजा सुरू झाली. त्यावेळी बिनती सुनिये आदिशक्ती मेरी, गणेश मंत्र, अथर्वशीर्ष, महालक्ष्मी अष्टकम्, नमोस्तुते, जागो सबेरा आया है, विश्व वंदिता ही भजने झाली आणि सर्वांना श्रीमाताजींचे साक्षात लक्ष्मीरूपाचे दर्शन झाले.त्यानंतर आरती झाली.

त्यानंतर जगभरातून श्रीमाताजींसाठी आणलेल्या भेटवस्तू सादर करण्याचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर श्रीमाताजी सर्वांना आशीर्वादीत करून आपल्या निवासस्थानी परतल्या. त्यावेळी सर्वत्र प्रचंड चैतन्य जाणवत होते. उपस्थित सर्व सहजयोग्यांच्या चेहऱ्यावर श्रीमाताजींचे आनंदी दर्शन घेतल्याचे समाधान दिसत होते. त्यानंतर सर्वांना प्रसाद देण्यात आला.

स्टेडियमच्या आवारात प्रवेश केल्याबरोबर रस्त्यावर सर्वत्र कलकत्ताहून मागविलेल्या लहान लहान दिव्यांच्या विद्युत रोषणाईच्या आकर्षक कमानी सर्वत्र उभारल्या होत्या. मुख्य स्टेडियममध्ये प्रवेश केल्यावर सुंदर स्टेज सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. स्टेजच्या मागे सात कोरीव खांबांच्या कमानी तसेच वरती ६ फुट बाय ६ फुट आकाराचे झुंबर बाजूला दहा हंड्या समोर तीन कमानी त्याच्या वर सुंदर गणपतीची मूर्ती, तसेच स्टेजच्या मागच्या कमानीच्या मधोमध गणपती, बाजूला दोन्ही बाजूला तीन तीन अशा सहा अप्सरा अशा फिक्कट गुलाबी रंगात केलेली स्टेजची आरास सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. तसेच स्टेजच्या समोरच्या बाजूला आकर्षक विद्युत रोषणाईचा मोर, व बाजूला विद्युत रोषणाईतील गणपती सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. त्याचबरोबर संपूर्ण स्टेडियमच्या बाजूला आकाशदिवे लावले होते. त्यामुळे सर्वत्र दिवाळीचे वातावरण जाणवत होते.

स्टेडियमध्ये परदेशी सहजयोग्यांसाठी राहण्याची व भोजनाची स्वतंत्र व्यवस्था केली होती. तर भारतीय सहजयोग्यासाठी स्टेडियमधील बंदिस्त हॉलमध्ये राहण्याची व्यवस्था केली होती. श्रीमाताजींच्या कृपेत संपूर्ण पूजा अत्यंत चांगल्या नियोजनात पार पडल्याबद्दल तसेच श्रीमाताजींची तब्येत चांगली असल्याचे सर्वांनी डोळ्याने पाहिल्याने सर्वजण आनंदात आपल्या घराकडे परतले.

● ● ●



## श्रीसूक्त

विष्णुपत्नीं क्षमां देवीं माधवीं माधवप्रियाम् ।
लक्ष्मीं प्रियसखीं देवीं नमाम्यच्युतवल्लभाम् ॥९॥

विवरण:- लक्ष्मीमाता ही साक्षात भगवान विष्णूंची पत्नी आहे. ती 'क्षमा' आहे. म्हणजेच साक्षात पृथ्वीमाता आहे. जिने आपल्याला धारण केले आहे.

माधवचा अर्थ -संस्कृतात मा म्हणजे लक्ष्मी. धव म्हणजे पती. तेव्हां माधव म्हणजे लक्ष्मीचे पतीदेव. अशा माधवाची माधवी ही बहिश्चर प्राण (पंचप्राणापलीकडे-इतकी प्रिय) आहे.

ती अच्युताची हृदयस्वामिनी आहे. अच्युतचा अर्थ-अतिशय कठीण अशा व्रतापासूनही न ढळणारा. ती अच्युतवल्लभा आहे. म्हणजेच अच्युताची आवडती आहे. अशा त्या लक्ष्मीमातेला आमचा सर्वांचा नमस्कार असो.

महालक्ष्मींच विद्महे विष्णुपत्नींच धीमहि ।
तन्नो लक्ष्मी:प्रचोदयात् ॥१०॥

विवरण: विद्महे म्हणजे जाणून घेतो. आम्ही महालक्ष्मीचे ज्ञान प्राप्त करतो. ती लक्ष्मी आम्हाला ज्ञानप्रकाश देवो. प्रेरणा देवो.

आनन्द: कर्दम: श्रीद:चिक्लीत इति विश्रुता: ।
ऋषयश्च श्रिय: पुत्रा: श्रीर्देवीर्देवता मता: ॥११॥

विवरण : आनंद, कर्दम, श्रीद, चिक्लीत असे लक्ष्मीचे प्रख्यात असे, (प्रसिद्ध असे)पुत्र तसेच अनेक ऋषी, देवी देवता आम्हाला ऐश्वर्य देवोत.

ऋणरोगादिदारिद्र्यपापक्षुदपमृत्यव:
भयशोकमनस्तापा नश्यन्तु मम सर्वदा ॥१२॥

विवरण: कर्ज, रोगराई,दारिद्र्य, पाप, अपघाती मृत्यू, भय, शोक मनस्ताप, या वाईट गोष्टी आमच्या बाबतीत नष्ट होऊ देत.

श्रीर्वर्चस्वमायुष्यमारोग्यमाविधात्शोभमानं महीयेत ।
धान्यं धनं पशुं बहुपुत्रलाभं शतसंवत्सरं दीर्घमायु ॥१३॥

विवरण : हे लक्ष्मीमाते आम्हाला तेज, आयुष्य, आरोग्य, आध्यात्मिक ऐश्वर्य, धन,धान्य, पशु, संतती, दे व आम्हाला शतायुषी म्हणजेच दीर्घायुषी कर.

श्रीसूक्तं समाप्तम्

## सहजयोगामध्ये प्रगती आणि कार्य

प.पू. श्रीमाताजींचा पाश्चात्य सहजयोग्यांना उपदेश.



सहजयोग सामूहिकतेमधूनच कार्यान्वित होणार आहे; कुणीही स्वत:ला इतरांपेक्षा चांगला सहजयोगी आहे असे समजून चालणार नाही.

कुण्डलिनी जागृती ही बीजाला अंकुर फुटावा तशी घटना आहे; अंकुर फुटल्यावर त्याची वाढ होण्याकडे तुमचे लक्ष असायला हवे. हे सहज होत असते. आत्मसाक्षात्कार मिळणे ही किती महान घटना आहे हे तुम्ही आधी लक्षात घ्यायला हवे. आजपर्यंत अशक्य वाटणारी ही अनुभूती तुम्हाला मिळाली आहे; म्हणूनच आता त्याची जोपासना करून त्यामध्यें अधिक वाढ व उन्नती होण्याची काळजी आपण घेतली पाहिजे. हे आपण जाणीवपूर्वक लक्षात घेत नाही म्हणून आत्मसाक्षात्काराकडे जेवढ्या गांभीर्याने पहायला पाहिजे तेवढ्या गांभीर्याने पहात नाही. शिवाय आपल्या आजूबाजूला चैतन्याची अनुभूती न मिळालेले लोकच जास्त आहेत; चैतन्य लहरींची काहींच अनुभूती न मिळालेले हे लोक संख्येने खूप जास्त आहेत. म्हणूनच गुरुनानकांनी 'अलख'या शब्दांत या शक्तीबद्दल सांगितले. सामान्य लोकांना आपल्यामध्येच परमेश्वरी शक्ती आहे, ती सर्वज्ञानी, सर्व समजणारी, सर्व यथायोग्य कार्यान्वित असते हे माहीतच नसते. या शक्तीकडूनच सामूहिक चेतना चालवली जाते. पण त्याची अनुभूती सामान्यांना नसते म्हणून 'अलख'- अपरोक्ष- असे तिला संबोधले.जागृतीनंतर या सामूहिक चेतनेबरोबर जोडले गेल्यामुळें तुम्हाला ते समजते. त्याशिवाय तिचे वर्णन, परमेश्वरी साम्राज्य वगैरे, फक्त शाब्दिक राहते.

जागृतीनंतर अनुभूती मिळाल्यानंतर मात्र, तुम्ही त्या जाणीवेमध्ये प्रगतीशील व्हायला पाहिजे. ही प्रगल्भता व वाढ मिळवल्याशिवाय तिचा उपयोग होणार नाही अलभ्य असा हा आशीर्वाद असल्याचे तुम्ही ध्यानात घेत नाही व तुमची त्यासाठी का निवड केली गेली आहे याचे भान ठेवत नाही आणि हे गृहीत धरूनच चालता. म्हणून सतत ध्यानांत राहण्याचा प्रयत्न करत रहा आणि परमात्म्याच्या प्रेमराज्यामध्ये प्रस्थापित होण्याचे लक्ष्य ठेवा. खरं तर परमात्म्याचे प्रेम कसे कार्यरत करते हे तुम्ही नीट समजून घेत नाही. एवढेंच नव्हे तर एखादा माणूसही तुमच्यावर प्रेमापोटीच प्रेम करत असतो हेही तुमच्या लक्षात येत नाही; अशा प्रेमाला 'निर्व्याज' प्रेम म्हणतात, त्यांत कसलाही स्वार्थ वा मतलब नसतो. असे प्रेम तुमच्या सुधारणेसाठी असले तरीही ते प्रेमापोटीच असते. परमात्म्याच्या या प्रेमापोटींच तुमच्यामधील बीजाला अंकुर फुटला आहे; परमात्म्याचे हे प्रेम तुम्हाला शक्ती, आत्मविश्वास, ऊब असे सर्व कांही पुरवते व तुमचा सांभाळ करते; विश्वाच्या निर्मितीच्या मागेंही प्रेमच आहे. तुम्हाला आशीर्वाद मिळाले त्याच्यामागेही प्रेमच आहे.

तुम्ही 'स्व'त:वर किती प्रेम करता, 'स्व'ला किती समजून घेता हा प्रश्न आहे, 'स्व'ची स्थिती किती जाणण्याचा प्रयत्न करता ही अडचण आहे. त्यामुळेच आत्मसाक्षात्कार मिळूनही, कुण्डलिनीचे जागरण होऊनही, परमचैतन्य प्रवाहित

होऊनही तुमची प्रगती म्हणावी तशी होत नाही. कारण तुमचे चित्त बाह्याकडे धावत असते; कधी-कधीं आत येते पण लगेच बाहेर जाते. मुख्य म्हणजे आपल्या जुन्या सवयी सुटत नाही, आपल्याला त्या चिकटून राहतात, आपली जीवनपद्धत, राहणीमानाच्या पद्धती, आपल्या विचारधारा इ. चालूच राहतात आणि आपण पूर्वीच्याचसारखे वागतो, राहतो.

सहजयोगाने तुम्हाला आत्मसाक्षात्कार दिला आहे पण बरोबरच लांब दोरा (Long rope) दिला आहे याचे भान ठेवायला पाहिजे. तुम्ही स्वतःकडे नीट लक्षपूर्वक भान राखले नाही, आंतल्या 'स्व'चे भान ठेवले नाहीत, स्वतःबद्दल प्रेम बाळगून आपण परमात्म्याचे फक्त उपकरण आहोत हे विसरलात तर तुमच्या लक्षात येणार नाही की तुम्हाला काय शक्ती मिळाली आहे जिचा उपयोग करून बुडणाऱ्या अनेक लोकांना वाचवणारे तुम्हीच आहांत. पूर्वी हातावर मोजता येतील इतक्याच थोड्या लोकांजवळ असणारी ही शक्ती तुम्हाला सहज प्राप्त झाली आहे याची महानता तुम्ही बाळगलीत तर ती कार्यान्वित करण्याच्या महत्कार्यामध्ये तुम्ही सहभागी व्हाल. तुम्ही सर्व सहजयोगी आहात म्हणून मी हे इतक्या स्पष्टपणे व कळकळीने सांगत आहे. तुम्ही तुमच्या कुण्डलिनीचे चलनवलन पहात नाही, ती तुमची स्वतःची आई आहे व तुमच्यावर तिचे अतोनात प्रेम आहे, तिच्याकडे तुम्ही नीट लक्ष दिले तर ती तुम्ही काय करायला पाहिजे, कसे करायचे याच्या तऱ्हतऱ्हेने सूचना देत असल्याचे तुम्हाला कळेल; कारण तिला तुमच्याबद्दल कळकळ आहे व तुमचा सांभाळ, तिलाच करायचा असतो. म्हणून प्रेमाने व समजूतदारपणे तिच्याकडे पहात रहा. ती लहान मुलासारखी तुमच्याबरोबर खेळ खेळत असते, तुमचे लक्ष इकडे-तिकडे वेधून घेत असते; ती तुम्हाला कधींच त्रास देणार नाहीं; फक्त तिच्याकडे सावधपणें फक्त बघत रहा. म्हणून तिच्याकडे व तुमच्यामधील 'स्व'कडे सतत लक्ष ठेवा. गहनतेत उतरलेले सहजयोगी तुम्ही पाहिले असतील. त्यासाठी तुम्ही कुण्डलिनीचे अवलोकन करत रहा. नाहीतर आत्मप्रकाश मिळाल्याचा काय फायदा? आत्मसाक्षात्कार मिळवला नाही तर मानवजन्माचा काय उपयोग? विजेचे उपकरण प्रवाहाला जोडले तर ते काम करणार, एरवी नाहीं. इतर सर्व बेकार आहे. म्हणून इतरांना आत्मसाक्षात्कार मिळवून देणारे तुम्हीच आहांत.

सहजयोग्यांनी स्वतःची शक्ती व जबाबदारी ओळखली पाहिजे. सहजयोगातून काही मिळवायचे असेल तर लोकांना जागृती देऊन सहजयोगांत आणणे. तसे तुम्हा प्रत्येकाला आयुष्यात काही ना काही मिळणार नाही. उलट कुण्डलिनीच्या कार्यामध्ये अडथळेच निर्माण होतील. तुम्हाला आत्मोद्धाराची तळमळ असेल तर त्यासाठीं तुम्ही काय करता हें महत्त्वाचे आहे. तुम्हा सर्वांना साक्षात्कार मिळाला आहे पण फक्त साक्षात्कार मिळण्याने काही होत नाही तर त्याच्या पुढचे कार्य तुम्हाला करायचे आहे. ज्यांना तो अजून प्राप्त झाला नाही त्यांच्याबद्दल करुणा बाळगून त्यांनाही तो प्रसाद मिळेल यासाठी तुम्हाला तळमळीनें कार्य केले पाहिजे. पण मी पहाते की लोक अजून इतर गोष्टींमध्ये अडकले आहेत. मला मान्य आहे की चरितार्थासाठीं तुम्हाला नोकरी-व्यवसाय सांभाळावा लागतो. पण तुम्ही हेही विसरता कामा नये की कुण्डलिनीचे कार्यही झाले पाहिजे व तुमची त्यांत वाढ झाली पाहिजे. आतां तुम्ही म्हणाल 'माताजी, हे आधी समजले कां? त्यासाठी आदि शंकराचार्यासारखी स्थिती तुम्ही मिळवली पाहिजे. म्हणून आधीं स्वतःबद्दल किती श्रद्धा आहे हे तपासून पहा. तुम्हाला स्वतःबद्दल आणि इतरांबद्दलही विश्वास हवा.

मी आधीपासूनच सांगत आले आहे की सहजयोग एकट्या-दुकट्यासाठी नाही; ज्याला असे वाटत असेल तर तो कामातून गेला समजा. सहजयोग सामूहिकतेमधूनच कार्यान्वित होणार आहे; कुणीही

स्वत:ला इतरांपेक्षा चांगला सहजयोगी आहे असे समजून चालणार नाही. एक कान वा एक डोळा दुसऱ्या कानापेक्षां वा डोळ्यापेक्षा स्वत:ला श्रेष्ठ समजतो का? विराटामध्ये आपापले कार्य करावे लागते. साक्षात्कारी म्हणून प्रत्येक सहजयोगी महत्त्वाचा आहे.

मान्य आहे की मी आदिशक्ती आहे, मला सर्व शक्त्या आहेत.पण तुम्हाला सर्वांना वर आणण्यासाठीं तुमच्यासारखे मानवरूप धारण करावे लागले; म्हणून तुम्हा सर्वांना स्वच्छ करण्यासाठी खूप कष्ट घ्यावे लागले. तुम्ही सर्वांनीही एकेक पायरी हातात हात घालून चढायची आहे. माझ्या कुण्डलिनीला कसली जरूर नाहीं पण तुमच्या सर्वांची कुण्डलिनी वर आणण्यासाठी कार्य करावेच लागते. ज्याच्या हृदयांत खरे प्रेम आहे, करुणा आहे तोच हे करु शकतो माझ्याजवळ अपरंपार प्रेम व करुणा आहे म्हणून मी हे कार्य करू शकले. तुम्हीही इतरांबरोबर तसेच रहा; त्यांच्या दोषांबद्दल टीका न करता त्यांच्याशी प्रेमानेच वागा. कुणीही दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ नसल्यामुळे सर्वांबद्दल प्रेम बाळगा. कुणी जास्त चांगला सहजयोगी असेल तर त्याचा सामूहिकतेलाच फायदा होणार आहे; पण स्वत:लाच तसे समजत असाल तर प्रगती थांबली म्हणून समजा. सर्वांना ठीक करणारी मी आहे खरं तर दुसऱ्यांना कसे ठीक करायचे तुम्हाला माहीत नाहीं. तुमच्यामधून शक्तिशाली चैतन्यलहरी प्रवाहित नसतील तर हे अवघड आहे. विशेषत: अहंकार वाढला असेल तर हे जास्तच कठीण. तुम्ही दुसऱ्याला हिणवण्यात त्याच्यावर प्रभुत्व गाजवण्यात पटाईत आहात. उघडपणे नसले तरी सूक्ष्मपणें हे फारच सोपे आहे.

सहजयोग म्हणजे फक्त प्रेम आहे. तुम्ही दुसऱ्यावर किती प्रेम करता हे महत्त्वाचे. एखादा फारच निगेटिव्ह असला तर तसे स्पष्टपणें सांगा. तुम्हाला चैतन्यलहरींतूनच हे कार्य करावयाचे आहे म्हणून तुमच्या हृदयांत आपुलकी, आस्था, हळुवारपणा व प्रेम हवे. प्रेमामधूनच सहजयोग पसरणार आहे. सहजयोगी एकमेकांशी कसे वागतात-बोलतात हे मी खूप वर्षांपासून बघत आले आहे. बरेचवेळा मृदुभावापेक्षा टीका करण्याकडेच जास्त, प्रवृत्ती दिसते. हे सगळं बदलले पाहिजे; तुम्ही एकमेकांवर प्रेम वाढवले पाहिजे; त्यामधें पैसा-अधिकार आणि कृत्रिमता इ. गोष्टी आड येता कामा नये. तुम्हाला आशीर्वाद मिळाले आहेत, आतां तुम्ही किती लोकांना मदत केली व सहजयोगात आणले हेच फक्त पहात रहा. नोकरी, धंदा, पैसा, पोरेबाळे यापेक्षां सहजयोगाचा प्रसार करण्यासाठीं काय करता इकडे लक्ष द्या. हा काळ फार मोलाचा आहे. अर्थात सहजयोगामध्ये कलसीही सक्ती नाहीं, कसलाही दबाव नाही;कारण सहजयोग फक्त प्रेम जाणतो. वर म्हटल्याप्रमाणे सहजयोग तुम्हाला Long rope देतो; चुका करत राहिलात तर तुमच्यातील चैतन्य वाहणे कधी थांबेल ते कळणारही नाहीं. तुमचे प्रत्येक काम प्रेमातून झाले पाहिजे कारण चैतन्य दुसऱ्याला देणें याला महत्त्व आहे; भौतिक गोष्टींतच अडकून राहिलात तर चैतन्याची शक्ती कमी होते. आमच्याकडे काही पवित्र स्थानांमध्ये देवता जागृत आहेत असे म्हणतात, तिथें चैतन्य लगेच जाणवते. तुम्ही जागृत देवता बनले पाहिजे. म्हणून तुमच्याजवळच्या महान शक्तीचा काय व कसा उपयोग करणार इकडे लक्ष द्या, तितके परिवर्तन तुमच्यामध्ये व्हायला हवे.

आशा आहे, मी जे सांगितले त्याचा तुम्ही गांभीर्यानें विचार कराल. सहजयोगाचे खरे महत्त्व ओळखाल आणि संपूर्ण शक्ती वापरून आपल्यामध्ये व जगभरातील लोकांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या महान कार्याशी समर्पित व्हाल. सर्वांना अनंत आशीर्वाद.


• • •

# बालेवाडी, पुणे दिनांक १२, नोव्हेंबर २००५











# दिवाळी पूजा, पुणे, दिनांक १३, नोव्हेंबर २००५













# दिवाळी पूजा, पुणे, दिनांक १३, नोव्हेंबर २००५













प्रतिष्ठान पूजा, पुणे दिनांक १२, नोव्हेंबर २००५

# म्युझिक प्रोग्राम, प्रतिष्ठान, दिनांक २०, नोव्हेंबर २००५











# तीर्थरूप पापाजी यांचे भाषण

## दिवाळी पूजा, दिनांक १२ नोव्हेंबर २००५

सर्वप्रथम, आपणा सर्वांना श्रीमाताजींनी प्रेम व अनंत आशीर्वाद दिले आहेत. मला माहीत आहे, की श्रीमाताजींच्या प्रकृतीच्या संदर्भात तुम्हां सर्वांना उत्कंठा ही असणारच.तुम्हाला माहीत आहे की, परमेश्वराने त्यांच्या रूपात अवतार घेतला आहे आणि मानवी रूपात अवतार घेतल्याने त्यातून जाणे अपरिहार्य आहे. त्यांच्या प्रकृतीची अगदी योग्य पद्धतीने काळजी घेतली जात आहे. त्यांच्या तब्येतीची तपासणी भारतातील तसेच परदेशातील तज्ज्ञ डॉक्टरांनी केली असून काही सहजयोगी डॉक्टर त्यांच्या तब्येतीची देखभाल २४ तास करत असून दोन वर्षापूर्वीपेक्षा आज त्यांची प्रकृती पुष्कळ चांगली आहे हे सांगण्यास मला आज आनंद वाटत आहे. मी त्यांना असे सुचविले की, तुम्ही, जगातील प्रत्येकाला सहजयोग मिळेपर्यंत या पृथ्वीतलावर राहिले पाहिजे, आणि ते त्यांनी मान्य केले आहे.

गेल्यावर्षी त्यांनी असे ठरविले की, त्यांनी आता हे सहजयोगाचे कार्य ३५ वर्षे केले आहे. सहजयोगाची निर्मिती त्यांनी केली. तसेच तो पसरवण्याचे कार्यही त्यांनी केले. गेली ३५ वर्षे त्या जगभर विमानाने, रेल्वेने, बसने, बैलगाडीने प्रवास करून हे सहजयोग प्रसाराचे कार्य अविरत करीत आहेत. आपल्या देशात तसेच परदेशात सर्व ठिकाणी हा प्रेमाचा संदेश देण्याचे काम त्या करीत आहेत. जगातील सर्व मानवजात या प्रेमानी एकत्रित गुंफण्याचे कार्य त्या करीत आहेत. त्यांचा संदेश म्हणजे, 'सारे जग हे एक कुटुंबच आहे, मानवजात हीच सर्वांची जात आहे. सर्वांचा परमेश्वर हा एकच आहे. सर्वांनी एकमेकांवर प्रेम करा.'

त्यांनी मला सांगितले की हा प्रेमाचा संदेश पसरवण्याचे काम म्हणजेच सहजयोग कार्याची जबाबदारी आता त्यांच्या मुलांनी म्हणजेच जगातील सर्व सहजयोग्यांनी स्वीकारावी, आणि जर तुम्हाला एकत्रितरीत्या हे कार्य पुढे न्यावयाचे असेल तर काहीतरी निश्चित अशी यंत्रणा हवी. सुसूत्रता हवी. त्यासाठी श्रीमाताजींनी एका 'वर्ल्ड कॅान्सिल'ची स्थापना केली असून त्यासाठी सामूहिक नेतृत्वाची उभारणी केली आहे. अशा सामूहिक नेतृत्वाबद्दल त्या गेली १० वर्षे सांगत आहेतच. सामूहिक नेतृत्व म्हणजे एकत्र येऊन काम करणे. म्हणजेच एकमेकांना या कार्यात मदत करणे. हे जागतिक स्तरावरचे काम आहे. भारत तसेच यु.के. ऑस्ट्रेलिया अशा ठिकाणी हे चालू केले आहे. मोठया प्रमाणावर सहजयोगी एकत्र येऊन, प्रचार प्रसाराचे कार्य अतिशय चांगल्या पद्धतीने करीत आहेत. हे कुणा एकटयाचे काम नसून सर्वांनी हे सामूहिक जबाबदारीने स्वीकारावे.

मला एक सांगावेसे वाटते की, भारतामध्ये एक ट्रस्ट निर्माण करण्यात आला असून त्याचे कामही सुरू झाले आहे. त्यांना त्यात चांगले यश आले आहे. मला सांगण्यास आनंद होत आहे की श्रीमाताजींचे छिंदवाडा येथील जन्मस्थान असलेले घर या ट्रस्टने घेतले आहे. ते सर्व जगातील सहजयोग्यांचे सदैव स्फूर्तिस्थान ठरेल. मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो की, हे स्थान जतन करण्यासाठी त्याचा जीर्णोद्धार केला जाईल, व त्याची जास्तीत जास्त देखभाल कायम करण्यात येईल.

आता तुम्हाला सर्व सहजयोग्यांना ही प्रचार प्रसाराची जबाबदारी स्वीकारायची आहे. श्रीमाताजींनी सहजयोगाची निर्मिती, उभारणी केली आहे. हा संदेश तुम्हाला सगळीकडे पसरवायचा आहे. ही जबाबदारी आता तुम्हाला घ्यायची आहे. आपल्या सुदैवाने, आत्तापर्यंत त्यांनी जे जे काही सांगितले त्याचे रेकॉर्डिंग

झालेले आहे. सी.डी, व्हिसीडी, कॅसेट्स कितीतरी आपल्यासाठी उपलब्ध आहेत.आता जबाबदारी कोणती? तर सामूहिक नेतृत्वाने ही जबाबदारी घ्यावी आणि प्रसार व्हावा.

सहजयोगाच्या एकमेव निर्मात्या श्रीमाताजी निर्मलादेवी असून त्याचे नेतृत्वही केवळ त्यांच्याकडेच आहे. आधीही त्यांच्याकडेच होते आताही त्यांच्याकडेच आहे आणि यापुढेही त्यांचेच एकमेव नेतृत्व असेल. आपण सर्व सहजयोगी याच्याशी जर सहमत असाल तर असा संदेश जगभर प्रसारित व्हावा की सदैव श्रीमाताजी याच एकमेव नेत्या असतील.

श्रीमाताजींनी प्रवचन देण्याचे थांबवण्यापूर्वी त्यांनी प्रामुख्याने दोन गोष्टी सांगितल्या. त्यातून त्यांनी सर्वांसाठी अतिशय मोलाचे असे दोन संदेशच दिले आहेत. पहिला संदेश म्हणजे, सर्व सहजयोगी किंवा सहजयोगिनी या एकच आहेत. कुणीही कुणापेक्षाही श्रेष्ठ-कनिष्ठ(लहान-मोठे)नाही. सर्वजण समान स्तरावर आहेत. सर्वजण हे अभेद आहेत. तेव्हां तुम्हाला सर्वांना आपण सर्व एकच आहोत ही भावना हवी. आज जगात याचीच जरुरी आहे ही भावना हृदयापासून यायला हवी.

दुसरा संदेश म्हणजे तुम्ही सर्वांनी एकमेकांवर मनापासून प्रेम केले पाहिजे. हे प्रेम कसे असावे? तर एक आई आपल्या मुलावर जितके उत्कट प्रेम करते, ते प्रेम जितके शुद्ध असते, त्यापेक्षाही ते अधिक शुद्ध असावे. खरंच जर असे तुम्ही सर्वजण स्वत:ला समान, एकच समजत रहाल एकमेकांवर प्रेम कराल, तर खरंच एक सुंदर समाज निर्माण होईल खरंच! हा किती सुंदर अनुभव आहे! आज समाजात इतरत्र अशांतता, भांडणे, मारामाऱ्या असे चित्र आहे. परंतु आपण सर्वजण मात्र आज या सहजयोगाच्या प्रेमाच्या धाग्यामुळे एकत्र येत आहोत. आपल्यात चांगले परिवर्तन घडून येण्यासाठी आपण सर्व एकत्र येतो. जर आपल्यातील प्रत्येकाने एक तरी नवीन सहजयोगी निर्माण करण्याचे ठरविले, तरी पुढच्या वर्षी ही संख्या निश्चितच दुप्पट झालेली असेल. असं करत सारे जगच सहजयोग्यांचे बनायला फार काळ लागणार नाही.

तेव्हा सहजयोग प्रचाराचे कार्य हे कुणा एका व्यक्तीचे किंवा काही व्यक्तींचे कार्य नसून हे सर्व सहजयोग्यांचे कर्तव्य आहे. कारण जगाला वाचविण्याचे कार्य हे फक्त सहजयोगामुळेच शक्य होणार आहे. श्रीमाताजींचे हे संदेश सर्व सहजयोग्यांनी कायम लक्षात ठेवावेत आणि त्याचा स्वत:अनुभव घेऊन दुसऱ्यांनाही तो द्यावा. सर्वांनी हा संदेश हृदयात साठवून तो आचरणात आणावा. तुम्ही खरंच खूप नशीबवान आहात! श्रीमाताजींनी अनेक वेळा दिलेली प्रवचने ही बऱ्याच सी.डी.ज कॅसेट्सच्या स्वरूपात आज उपलब्ध आहेत. ह्या व्ही.सी.डी. इतरांना दाखवा कारण लोकाना श्रीमाताजींना त्यामध्ये पहायचे असते. सहजयोग प्रसारासाठीही त्याचा उपयोग होईल. खरंच हा केवढा अमूल्य ठेवा आहे! हेच आपले खरे ऐश्वर्य आहे. तेव्हा ह्या सी.डी. व व्हि.सी.डी. कॅसेट्स योग्य प्रकारे जतन करा. श्रीमाताजींनी वेळोवेळी दिलेले प्रेमाचे संदेश तुम्हाला ह्या द्वारे सर्वांना देता येतील.

तेव्हा कृपया सर्वांनी एकमेकांवर प्रेम करा. प्रेम करा. मी आज येथे त्यांचे संदेश देण्यासाठीच आलो आहे. श्रीमाताजींचे प्रेम व आशीर्वाद हे तुमच्या पाठीशी सदैव आहेतच.मी सर्वांचे आभार मानतो आणि मी तुम्हाला असे आश्वासन देतो की, तुमच्या आईची काळजी उत्तम प्रकारे घेतली जाईल. माझे आता जीवनात सतत एकच काम आहे ते म्हणजे त्यांची काळजी घेणे. माझ्यावर विश्वास ठेवा की त्यांची प्रकृती दोन वर्षापूर्वीपेक्षा आता निश्चितच चांगली आहे. पुन्हा एकदा आभार. माझी तुम्हाला आगदी कळकळीची विनंती आहे की, हा सहजयोगाचा ध्वज उचला आणि पुढे जा.

● ● ●

## प.पू. श्रीमाताजींचे प्रवचन

राहुरी २६ फेब्रुवारी ८४



सर्व जगाला मंथून टाकणाऱ्या या महान क्रांतीकारक चळवळीचे आपण एक पायिक म्हणून आपण आता सर्व तयारीनिशी सिध्द असले पाहिजे. आपल्या उथळ विचारांना व उथळ वागणुकीला टाकून आपण या कार्यात पूर्णपणे उतरणे हे महत्वाचे आहे.

स्वस्थतेचे उगमस्थान आपला आत्मा आहे. आपले चित्त जेव्हा आपल्या आत्मसुखाकडे रहाते तेव्हा बाह्यातील सुखोपभोग गळून पडतात. आपण कोठे राहतो, कोठे झोपतो, काय खातो, काय करतो याची चिंता करत नाही. अशा बाह्य गोष्टीवरील लक्ष दूर करण्याचा प्रयत्न करा व आतील जाणीवा वरील लक्ष दूर वाढवा. आपले घड्याळाबरोबर धावण्याची आपली सवय घालवण्यासाठीच तुम्ही येथे आलात. ही जीवघेणी धावपळ एकदाची थांबली पाहिजे, ती आपोआप थांबेल, जेव्हा ध्यानातून आपले चित्त आत येईल तेव्हा आतून शांतता मिळवाल, जी प्रत्येक मानवाला आवश्यक आहे, ज्यामुळे आपण सर्वजण जगाला विनाशापासून वाचवू.

तुमच्या लक्षात आलेच असेल की सहजयोग वेगाने वाढत आहे. त्याने गती घेतली आहे. सर्व जगाला मंथून टाकणाऱ्या या महान क्रांतीकारक चळवळीचे आपण एक पायिक म्हणून आपण आता सर्व तयारीनिशी सिध्द असले पाहिजे. आपल्या उथळ विचारांना व उथळ वागणुकीला टाकून आपण या कार्यात पूर्णपणे उतरणे हे महत्वाचे आहे. आपण सर्व प्रबळ आहोत. या शिवाय तुम्ही ईश्वरी शक्तीने आशिर्वादीत आहात. या शक्तिचा स्वत:करता पूर्ण उपयोग करा . तिच्याशी एकाकार व्हा. त्याकरीता आपल्या शरीराला टाकीसारखे छिना शरीराला मनाला अहंकाराला रोका आणि त्या पैलूतून तुमची सुंदर प्रतिमा साकारू द्या. ज्याकरीता तुम्ही निवडले आहात.

दुसरी गोष्ट म्हणजे माझे तुमच्या देशातील दौऱ्यामुळे तुम्हाला अनेक चांगल्या गोष्टी प्राप्त झाल्या आणि जेव्हा तुम्ही माझ्या या देशात येता तेव्हा तुम्ही इथलेच आहात असे तुम्हाला वाटते आणि तिकडच्या देशात तुमचे जीवन उध्वस्थ असल्यासारखे वाटते. इकडे तुम्ही येता आणि खऱ्या अर्थाने संपन्न होता आणि तिकडे देशात मी एवढे प्रयत्न करते, खूप कष्ट घेते सर्वकाही तुमच्याबरोबर राहून करते तरी फारसे यश येत नाही. पण येथे ते सहज प्राप्त करता आपले उध्वस्त जीवन विसरा. मला तुम्ही येथूनच तिकडे गेला आणि आता परत येथेच आलात असे वाटते, स्थलांतर कायद्यामुळे या स्थितीत मला वाटते तुम्ही इथेच राबवा. त्यामुळे तुमच्या येथे सतत येण्याने तुम्ही उन्नत व्हाल. येथे सतत ३/४ महिने राहून थोडी मिळकत जमवून येथे तुम्ही स्वत:ला घडवा. तिथे अनेक प्रयत्न करुन फारसे काही प्राप्त झाले नाही. आपल्या या सर्व दौऱ्यातून शेवटी हेच सिद्ध होते.

इथले जीवन खडतर, रस्ते खडबडीत असले तरी आपण सर्वजण मजा घेत आहात. मी जेव्हा तुम्हाला पहाते, तुमचे सर्व काही व्यवस्थित आहे, अधिक उत्तम व सर्व काही व्यवस्थित आहे, अधिक उत्तम व सर्व काही सुस्थितीत जमले आहे जसे घड्याळाची गुणवत्ता ठरविण्यासाठी त्यांना वाहत्या पाण्यात सोडले जाते

नंतर तबकात टाकून जोरात हालवले जाते या परीक्षेतूनही नंतर जे व्यवस्थित चालतात ते कुठल्याही परिस्थितीत कार्यक्षम राहतात तेच ठीक समजले जातात. त्याचप्रमाणे तुम्हाला या सर्व खडतर प्रक्रियेतून तुम्ही बाहेर पडता व आतून पक्के होता. हे सर्व घडताना पाहून मला आनंद वाटतो आणि हीच गोष्ट आपण प्राप्त केली आहे.

नंतर आपले लक्ष पैशापासून दूर असले पाहिजे. ही एक मोठी समस्या आहे. अगदी श्रीमंत राष्ट्रेही सतत पैशाच्या मागे असतात. भारतापेक्षा जास्तच, हे पाहून आश्चर्य वाटते. प्रत्येक पै न पै मोजून घेणारे हे देश खरंच प्रगत आहे का यावर विश्वास बसत नाही. भिकाऱ्यापेक्षाही कठीण परिस्थिती पैशाची ही चटक फारच विलक्षण आहे. तरी तुम्ही त्यापासून लांब रहा, पैशाची ही नाणी मोजत रहाण्यापेक्षा देवांची नावे घ्या.

यानंतर सुखासोयींची लागलेली चटक, तिकडचे जीवन इतके सुखावहा आहे असे मला वाटत नाही. इकडे रात्रीही तुम्ही फिरु शकता. येथे कोणीही तुमचे पाकीट पळविणार नाही, बांगड्या हिस्कावणार नाही. तुम्ही निर्धास्तपणे फिरु शकता. दारु पिऊन एकमेकांशी धक्काबुक्की करणारे दिसणार नाही. सर्व काही सुरळीत आहे. ही एक मोठी प्राप्ती आहे.

येथे तुम्हाला जरुर असणाऱ्या सुखसोयींचा नंतर विचार करा. या सर्व आधुनिक सुखसोयी इथे तितक्या आवश्यक नाही. इथल्या परिस्थितीशी जुळत्या नाहीत. असल्या अनावश्यक कल्पना येथे उतरवण्याची जरुर नाही. एकंदरीत येथे वैयक्तिक स्वच्छता उत्तम होते, तरीही येथील लोकांना सर्वसामान्य स्वस्छता करण्याची शिकवन तुम्ही त्यांना दाखवा. अशा तऱ्हेची तुमच्यातील देवाण- घेवाणेची क्रिया फलदायी आहे, हे मात्र निश्चित. आणि तुमच्या अंतरात जे काही घडते त्यामुळे तुम्ही वेगाने उन्नत व्हाल. येथे तुम्ही येऊन काही काळ राहून काही मिळवा व मग तुमच्या देशात परत जा. मग तेथील निगेटीव्हीटीची तुम्हाला पूर्ण जणीव होईल.

नंतरचा मुद्दा म्हणजे तुम्ही येथे काही तरी साध्य करण्यासाठी आला आहात. याची जाणीव ठेवली पाहिजे. तुमच्याकडून घेण्यासारखे तर काही नाही. तुम्हीच काही मिळवा. तुम्ही विद्यार्थासारखे आहात, काहीतरी चांगले शिकून घ्या, शिस्त निर्माण करा, एखाद्या शिष्यासारखे शंका विचारा, हे काह आहे? कसे आहे? हे घर आहे, छान आहे. अवास्तव गोष्टींना थारा देऊ नका, वायफळ गप्पांना दूर ठेवा. ज्याचा काही संबंध नाही त्या सर्वांचा त्याग करा. त्यापेक्षा शांत रहा व आतून ती वाढवण्याचा प्रयत्न करा. येथील लोकांना वेळ नसतो. त्यामुळे ते बडबडत नाही, ते आपल्या कामात गुंतलेले असतात. तुम्हाला तिकडेही भरपूर वेळ असतो, येथेही असतो म्हणून तसे वागू नका. हे करणे चूक आहे.

काही वेळेला आतूनच तुम्ही स्वत:च्या मनाशी बोलत राहता. सतत जसे काही गोष्टींचे पृथ:करण करत बसता किंवा टीका करणे, दोष काढणे आणि विचार करत बसणे हे आतून चालू राहते ते बंद करा. एकंदरीत मागिल दौरा व यावर्षीचा दौऱ्यामुळे तुमचे सामर्थात अनेक शक्यता माझ्या समोर आल्या ज्यामुळे मी खूप आनंदीत झाले. मी खरोखरच समाधानी आहे की या वर्षी तुम्ही जे मिळविले, येथील नवीन वातावरणात तुम्ही बनला सर्वकाही नम्र अगदी शांतपूर्ण आणि आता ओढून घेणारे चैतन्य सर्व काही महान आनंददायक असे मला आहे.

याबद्दल मी तुमची सर्वांची आभारी आहे आणि मला आशा आहे की अशारीतीने तुमची अधिक प्रगती होत जाईल.

तुम्हाला अनंत आशीर्वाद.

# पसायदान

आता विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥
जे खळांची व्यंकटी सांडो। तयां सत्कर्मी रती वाढो।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचें ॥
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो।
जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात ॥
वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी।
अनवरत भूमंडळीं । भेटतू भूतां ॥
चला कल्पतरूंचे आरव। चेतना चिंतामणींचे गांव।
बोलते जे अर्णव। पीयूषांचे ॥
चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥
किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकी इयें।
दृष्टादृष्ट विजयें । होआवें जी ॥
येथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल दानपसावो।
येणे वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥

## पसायदान अर्थ

' आता एवढा ग्रंथरूपी वाग्यज्ञ जो संपूर्णतेस गेला आहे तो ज्या विश्वरूप, विश्वात्मक देवाला उद्देशून केला आहे त्याने या यज्ञाने संतुष्ट व्हावे व मला असे पसायदान द्यावे की खल, दुर्जन यांच्या मनातील दुष्ट, कपटी विचार नाहीसे होऊन त्यांना सत्कर्माची आवड जास्त वाढती राहो, आणि प्राणिमात्रांमध्ये जीवाभावाची मैत्री होवो. पूर्वपापाचा अंधार जावो व विश्वावर स्वधर्मरूपी सूर्याचा दिवस उगवून प्राणिमात्रांना जे जे इष्ट असेल ते ते घडो. सर्व मांगल्याचा वर्षाव करणारा जो ईश्वरनिष्ठ संतांचा समुदाय आहे, त्यांची या पृथ्वीतलावर सर्वांना नेहमी संगती लाभो. जे हे संत सज्जन चालते बोलते कल्पतरूंचेच बाग आहेत किंवा सचेतन असे चिंतामणींचे गावच आहेत, जे अमृताचे बोलके सागर आहेत, आणि जे चंद्रासमान शीतलता देणारे असून लांछनरहित आहेत, सूर्यासमान प्रकाश देणारे असून उष्णतेचा ताप न देणारे आहेत, ते सर्वांना सदा सोयरे होवोत. किंबहुना तिन्ही लोक सर्व सुखांनी पूर्णपणे भरून जावोत व लोकांनी सर्वत्र त्या आदिपुरुषाचीच भक्ती करावी. या ग्रंथाच्या उपदेशानुसार वागून जीवनात आचरण करणारे जे लोक असतील त्यांना ऐहिक व पारलौकिक सर्वत्र विजय प्राप्त होवो'

या प्रार्थनेला उत्तर म्हणून तो विश्वाचा ईश म्हणाला- 'तू मागतोस तो प्रसाद तुला देईन' या वरदानाने ज्ञानदेव सुखी झाला.

# हंस चक्राबाबत

## प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवी यांच्या भाषणातील संक्षिप्त अंश

- हंस चक्र जागृत व सतर्क असेल तर आपल्याला काय शुभ आहे व काय नाही हे लगेच समजते. आपल्यामध्ये ईश्वरी विवेक प्राप्त होतो.

- डोळे फार महत्त्वाचे असून ते आत्म्याची खिडकी आहेत असे म्हणतात. तुम्ही पाहिले आहे की कुंडलिनीचे उत्थान झाल्यावर आणि आत्मा प्रकाशित झाल्यवर डोळ्यांच्या बाहुल्यांचा आकार मोठा होतो आणि तुम्ही निरागस मुलासारखे दिसता व तुमच्या डोळ्यात चमक असते.

- हंस चक्र जागृत झाल्यावर आपल्यात विवेक विकसित होतो. संस्कृतमध्ये एक सुंदर श्लोक आहे. त्यात असे म्हटले आहे की, हंस आणि बक दोन्ही शुभ असतात, तर हंस व बक यांच्यात फरक काय- तर उत्तर असे की दूध व पाणी एक केल्यास हंस त्या मधील दूध शोषून घेईल परंतु बगळ्यामध्ये तसा विवेक नसतो.

- हंस चक्रावर देवता नाही परंतु बुद्ध, महावीर, ख्रिस्त व श्रीकृष्ण या चार देवता ज्यांची काळजी घेतात, त्या अवयवांची निराकार शक्ती हंस चक्रावर असते आणि त्याचे व्यवस्थापन श्री गणेश करतात. म्हणून हे उपजत गुण श्री गणेश तेथे घालतात कारण श्री गणेश सुज्ञतेचा स्त्रोत आहेत.

- अंड्यामधून पक्षी बाहेर आल्यावरही अंड्यामधील अनेक गोष्टी त्याच्या शरीराला चिकटलेल्या असतात. तेव्हा आत्मसाक्षात्कारानंतर प्रथम विवेक तुम्हाला मिळायला हवा. त्याशिवाय आत्म्याची विशुद्ध अवस्था कशी मिळणार?

- हंस चक्र सर्वात महान गोष्ट करते. तुम्हाला ज्ञात आहे की नाही मला माहीत नाही, ते हे की तुमची सर्व कर्म, फळे नष्ट होतात. तुम्ही तुमच्या पूर्वजांच्या कर्मफळांसाठी जबाबदार रहात नाहीत तुम्ही जी काही चुकीची कामे केली असतील ती नष्ट होतात. जणू काही तुमच्या भूतकाळापासून तुम्ही पूर्णपणे अलग होता.

● ● ●

# दिवाळी पूजा

प. पू. श्रीमाताजी
निर्मला देवींचे भाषण
(सारांश)
ऑक्टोबर ८९



सुषुम्नेच्या मध्यमार्गावर राहिल्याने महालक्ष्मी तत्व वाढते. मग कोणीही तुम्हाला हात लावूं शकणार नाही.

दिवाळी पूजा म्हणजे देवांचा आनंद जाणून घेणे. दिवाळी १००० वर्षापूर्वी श्री रामांचा राज्याभिषेक झाला तेव्हा साजरी केली गेली. म्हणजे मानवतेच्या हिताचे त्या दिवशीराज्य रोहन झाले. सॉक्रिटीसने वर्णन केल्याप्रमाणे तो हितकारी राजा होता. हितकारी राजाचे राज्यरोहण झाले ही आनंदाची गोष्ट होती. जेव्हा लोक प्रजेच्या हिताशिवाय दुसरा कशाचाही विचार नाही असा राजा शोधून काढतात, तेव्हाच फक्त ही गोष्ट शक्य होते. तेव्हा आपण या निणर्धयाप्रत येतो की माणसाला सहजयोगी बनले पाहिजे. आपल्याकडे दोन प्रकारचे सिद्धात आहेत. एक म्हणजे (कॅपिटॉलीझम) भांडवलशाही व (कम्युनिझम) साम्यवादी. पहिली पैशावर आधारीत बदुसरी आज्ञाधारकतेवर. जी सहजयोगासाठी चांगली आहे. आज्ञाधारकणा इतका महान आहे की, त्यांच्या हितासाठी त्यांना काही सांगा, ते लगेच तसे करतात. ते इतके सुज्ञ आणि गहन झाले आहेत. उलट दुसरीकडे आपण व्यक्तिगत स्वातंत्र्यात हरवलो आहोत. भांडवलाशाहीच्या देशात हित संपुष्टात आले आहे. जेव्हा तुम्हाला वेड्यासारखे धावत सुटअण्याचे स्वातंत्र असते, त्यावेळी तुम्ही स्वत:चा विनाश करुन घेता. उदा. लोक कुठल्याही प्राकरच्या विचीत्र फॅशनविषयी वेडे झाले आहेत, या कल्पना उद्योजकांकडून येतात. ज्यांना तुमचा पुरा फायदा घ्यायचा असतो. हित हे सर्वोच्च आहे. आपण खरोखर स्वतंत्र लोक असलो तर आपल्यासाठी जे हितदायी आहे ते आपण स्विकारले पाहिजे.

दुसऱ्या दिवशी नरकासुर हा राक्षस देवाने मारला होता. आता दुष्ट लोक बक्षिसे घेत आहेत, हा विर्पयास कशासाठी ? दुष्ट कृत्यांचा आनं उपभोगणाऱ्या आपल्या मधिल दुष्ट प्रवृत्तीचा नाश केला पाहिजे. आपल्याला आपले प्रश्न अओळखले पाहिजेत. जेव्हा तुम्ही स्वत: पहाल तेव्हा हृदय उघडे होते. तुमचे हृदय उघडल्याशिवाय तुम्ही स्वत:चा आनंद उपभोगु शकत नाही. तुम्ही तुमचे हृदय उघडा. सर्व बंधने अटी निघून जातील.

प्रत्येक लहान गोष्टींमध्ये आनंदाचा तरंग आहे. तुमची जातपात, देश सर्व काही विचरा. तुम्ही जर तुमच्या सामुहीकतेमधे एकत्र होऊ शकला नाही तर तुमच्यामधे काहीतरी चुकते आहे. या दिवशी लक्ष्मी देवतेची पूजा केली जाते. तीला गर्व नसतो. ती इतरांवर दबाव घालत नाही. मानव प्राणी याउलट असतो. ज्याच्याकडे पैसे आहेत ते घोड्यावरून जातात. लक्ष्मी पाण्यावरून बाहेर येते, कमळावर विश्रांती घेते आणि स्वत:चे वजन शोषून घेते. आपल्याला आपली स्थिती, पैसा, शिक्षण घेतले पाहिजे. ह्या सर्व निरर्थक गोष्टी तुम्हाला जड व्यक्ति वरुन खाली ओढत असते. लक्ष्मीचा गुरुत्वाकर्षणाचा मध्य व्यवस्थित संतुलनात असतो. त्याच प्रमाणे तुम्हालाही संतुलनातच राहिले पाहिजे. तुम्हाला पृथ्वी मातेवर उभारले पाहिजे म्हणजे लहानशी गोष्ट झाली तरी तुम्ही संतुलनामध्ये येऊ शकता. तिच्या दोन हातात गुलाबी कमळे असतात. गुलाबी रंग उब, अगत्य, प्रेमळपणाचा स्वभाव दाखवतो. ऊब म्हणजे हॉस्पिटल नव्हे किंवा घाणेरडे घर नव्हे तर आगत्यपुर्वक, ऊबदार सोयीचे श्रीमंत माणसाकडे दहा कुत्री बाहेर असतात, आत कोणी येऊ शकत नाही. काहीही जास्त नको. दिमाख नको, चढाई नको पण

इतरांना आनंद सोय देईल असे एखाद्या गोष्टीचे कौतुक व्हावे आणि यजमानाने म्हणावे इतक्या थोड्यात त्याने केले, ही अतिथीला आनंद द्यावा असे वाटणाऱ्या व्यक्तिची खूण आहे. हे किती महान सदर सांगणे म्हणजे चढून जाणे आहे. तुम्ही सर्वांचा आनंद उपभोगला पाहिजे, नाही तर सहजयोगीच नाही. तुम्ही कलावंतांना उत्तेजन दिले पाहिजे. कोणीतरी म्हणेल हा प्रामाणिकपणा नाही. कमळ चिखलाच्या तळ्यात उगवते, पण तुम्हाला चिखल दिसत नाही. पुर्ण तळे कमळांच्या सुवास आणि सौंदर्याने भरते. तीथे प्रामाणिकपणा नसतो. सहजयोगी म्हणुन तुमचे काम काय आहे हे प्रामाणिकपणे समजण्यातच प्रामाणिकपणा आहे. तुमच्या प्रेमाने तुम्ही प्रत्येकाला उत्तेजन देत असता. तुमच्या प्रेमाने प्रत्येकात विश्वास निर्माण करीत सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे स्वतःशी प्रामणिकपणे रहा. प्रथम तुमच्या मनाला अजमाऊन घ्या. दुसऱ्याला लागेल असे बोलणार असाल तर ते थांबवणे बरे. दुसऱ्यांना खुश करणाऱ्या गोष्टी तुम्ही म्हणाल तर, तशाच प्रकारच्या तुम्हाला खुश करणाऱ्या गोष्टी तुम्हाला मिळतील. काही लोक असे असतात की ते कधीच हसत नाहीत, त्यांना गुदगुल्या करणे तुम्हाला माफ आहे, तुम्हाला मुलांसारखे बनले पाहिजे. लक्ष्मीतत्वाचे एक तत्व आनंदी राहणे हे आहे. दुसऱ्या हाताने लक्ष्मी येते. पैसेवाल्या लोकांनी ज्यांना गरज आहे अशांना पैसे द्यावेत पण अशा तऱ्हेने की कोणाला कळू नये. एकदम गुपचुप असे की एका हाताला दुसऱ्या हाताने दिले आहे हे समजता नये. व्यक्तिची गरज काय आहे हे पाहायला पाहिजे. योग्य जागी आणि योग्य वेळी देण्याची गरज आहे. हे खळबळजनक नको, त्याने हृदय भरून आले पाहिजे. आध्यात्मिक वाढीसाठी तुम्ही जे घ्याल ते उत्तम.

दुसऱ्या हाताने लक्ष्मी रक्षण करते. हा हात सर्व सहजयोग्यांचा रक्षणकर्ता आहे. मी नेहमी सहजयोग्यांच्या पाठीशी उभी राहिल कारण तीथे आत्मा हजर आहे. सर्व कलावंत, कला, काव्य, साहित्य, प्रामाणिक राजकारणी लोक, सरळमार्गी सरकारी नोकर आणि ज्यांना रक्षणाची जरुरी आहे, त्या सर्वांचे मी रक्षण करील. पण जे खराब आहेत, त्यांना आधार देऊ नये. दुसऱ्यांच्या चांगुलपणाचे रक्षण केले पाहिजे. मग ते सहजयोगी नसले तरी हरकत नाही. त्यांच्या चांगल्या गुणांचे रक्षण केले पाहिजे. तुम्ही अक्षय, चिरंतन, जगाचे संरक्षक आहात. तुम्ही क्रूर होता कामा नये. जेव्हा सासु-सुनेचे भांडण आपण पहातो तेव्हा म्हणतो की, किती भांडकुदळे आहेत. तरी पण आपण तेच करतो. आपण तलवारी नाहित तर कमळे आहोत. कोणाला मारायचे असेल तर कमळाने मारा, तलवारीने नको. कमळाने कसे मारायचे हे शिकण्यासाठी सहजयोगात फार गहनात उतरायला पाहिजे.

एकदा लक्ष्मीने तुम्हाला आश्रय दिला की तुमचे महालक्षीतत्व वाढते. नंतर तुम्ही जगाच्या हिताचा विचार करता. त्यांना आत्मसाक्षात्कार कसा द्यायला. या बद्दल तुमचा दृष्टीकोण बदललेला असतो. आपण प्रश्न सोडविण्याकरिता आलेलो असून जग हा आपला प्रश्न आहे. आपल्याला जबाबदाऱ्या घेतल्या पाहिजेत. तुम्ही आर्किटेक्ट असाल, तर आपल्या हातून काहीतरी महान निर्माण करा. संगीतज्ञ असाल तर चांगले संगीत तयार करा. मी तुम्हाला मदत करेन. प्रत्येकाचे व्यक्तिमत्व वाढते आहे. जर सुषुम्नेच्या मध्य मार्गावर रहाल तर कोणीही तुम्हाला हात लावु शकणार नाही. दुसऱ्यातल्या चुका तुम्हाला काढावयाच्या नाहीत. मग तुम्ही सहजयोगीच नाहीत. लिडरने सुद्धा ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करु नये.

ब्रह्मचैतन्य हे शांत तत्व आहे सर्व काही तेच करते, तुम्हाला सर्व काही स्वीकारण्यासाठी, तसेच तुमच्या प्रगतीत कैलासाची उंची गाठण्यासाठी नेहमी शांत राहिले पाहिजे. ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो.

●●●

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥

# म्युझिक प्रोग्राम, प्रतिष्ठान, दिनांक ३०, नोव्हेंबर २००५













# म्युझिक प्रोग्राम, बालेवाडी पुणे दिनांक १२,१३ नोव्हेंबर २००५















